संक्षिप्त फौजदारी प्रकरण क्र. ८८३/२०१४

महाराष्ट्र सरकार –वि– सुभाष

निशाणी क्र. १७

सरकार तर्फे साक्षीदार क्र. ०३

मी याद्वारे शपथपुर्वक निवेदन करतो की,

माझे नावः मधुकर

वडीलांचे नावः शंकर

आडनावः वाघमारे

माझे वयः ५२ वर्ष, व्यवसायः शेती,

राहणारः बोरगांव, ता. भोकरदन, जि. जालना.

**<u>सरतपासणी सरकारी वकिल श्री. ए. एन. गवळी यांच्याद्वारे</u>**

०१. दि. ०४/०८/२०१४ रोजी मी, ज्ञानेश्वर वाघमारे, फारुख शेख, प्रभाकर वाघमारे असे सकाळी १०.०० वाजता बाणेगांव फाटा येथे उभे होतो. त्यावेळी दुधाचा टेम्पो मौजे राजूरकडून भोकरदन दिशेने आला व त्याने ज्ञानेश्वर वाघमारे यांना धडक दिली. ज्ञानेश्वर वाघमारे यांना डोक्याला व छातीला मार लागला होता. सदरचा टेम्पो हा न थांबता भरधाव वेगाने निघून गेला. टेम्पोचा क्रमांक मी पाहिला होता तो एमएच २८ बी. ९९६३ असा होता. काही दिवसांनी टेम्पो आरोपी चालवत असल्याचे मला सांगितले.

सरतपास पुर्ण

**<u>उलटतपास आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. जी. एस. ठोंबरे यांच्याकडून</u>**

०२. हे म्हणणे खरे आहे की, ज्ञानेश्वर वाघमारे हा माझा चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, तथाकथित घटनेवेळी टेम्पो कोण चालवत होते हे मला त्यावेळी मी पाहिले नव्हते. आरोपी टेम्पो चालवत असल्याचे मला तीन ते चार दिवसांनी समजले. मी स्वतः आरोपीविरुध्द नांव समजल्यानंतर तक्रार दिली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गाडी चालवत असल्याची बाब समजल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासामध्ये नमूद घटना घडली नाही. हे म्हणणे खरे नाही की, ज्ञानेश्वर यास नुकसान भरपाई मिळावी म्हणुन खोटी तक्रार दिली. हे म्हणणे खरे नाही की, खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत

स्वाक्षरीत/–

दिनांकः १८.०७.२०२५

(मयुरेश आर. काळे)
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, भोकरदन